# महाराष्ट्र शासन
## उच्च व तंत्र शिक्षण विभाग
## राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान
## राज्य प्रकल्प संचालनालय (रुसा)

युनिट क्र. ७, १९ वा माळा, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर-१,
कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.

ई-मेल- spdrusamah@gmail.com — दूरध्वनी क्र. ०२२-२२१६०९४३/५९

मनीषा वर्मा, भा.प्र.से.
संचालक


---

क्रमांक- प्रसं/रुसा/आदेश/१५-१६/ 209 — दिनांक- 31/०३/२०१६

कार्यालयीन मंजूरी आदेश

**विषय :-** राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा ) या योजनेअंतर्गत प्राप्त निधी वाटपास व करावयाच्या कामांना मंजूरी देणेबाबत.

**संदर्भ :-** १) केंद्र शासनाचे पत्र क्र. F No. २४-३७/२०१४-U.Policy(MHIGUIGC-Gen/SC/ST) dated २९ Sept. २०१५.

२) केंद्र शासनाचे पत्र क्र. F No. २४-३७/२०१४-U.Policy(MHIGUIGC-Gen/SC/ST) dated ३० डिसेंबर २०१५.

३) शासन पत्र क्र. रुसायो-२०१६/(१९८/१६)मशि-४, दि. ३० मार्च २०१६.

**प्रस्तावना -**

राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान ( रुसा ) अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या रु. २५१ कोटीच्या आराखडयास दि. ०२ सप्टेंबर २०१५ च्या प्रकल्प मंजूरी मंडळाच्या बैठकीमध्ये मंजूरी मिळालेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ५ शासकिय महाविद्यालयांचा (बी.एड महाविद्यालय औरंगाबाद, शासकिय महाविद्यालय गडचिरोली, शासकिय विज्ञान संस्था नागपूर, वसंतराव नाईक महाविद्यालय नागपूर, राजाराम महाविद्यालय कोल्हापूर ) समावेश आहे. या सर्व महाविद्यालयांना / संस्थांना घटक क्रमांक ७ (Infrastructure Grants to Colleges) अंतर्गत प्रत्येकी २ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने संबंधित महाविद्यालयांनी /संस्थांनी त्यांना करावयाच्या कामाचा कृती आराखडा व कामांचे प्राधान्यक्रम संचालनालयाला सादर केले आहेत. प्राधान्यक्रमाने करावयाच्या कामाची कामांची छाननी संचालनालय स्तरावर करण्यात आली असून केंद्र व राज्य शासनाच्य हिश्याच्या प्रमाणात उपलब्ध झालेला निधी संदर्भ क्र. २ अन्वये वितरीत करण्याची व प्राधान्यक्रमाने करावयाच्या कामांना मंजूरी देण्याची बाब विचाराधीन होती.

**आदेश -**

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र. २ अन्वये वितरीत करण्यात आलेल्या रुपये २५ लक्ष इतक्या निधीच्या प्रमाणात प्राधान्यक्रमाने करावयाच्या खरेदीच्या कामांना सोबतच्या परिशिष्टानुसार व खाली नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून **शासकिय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली** यांना मंजूरी देण्यात येत आहे.

१) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत साधनसामुग्री व उपकरणे खरेदी प्रक्रिया सर्व शासकिय महाविद्यालये/ संस्थांनी वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेतील तरतुदी तसेच शासनाने उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या दि. ३०/१०/२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदरची खरेदी प्रक्रिया महाविद्यालयांनी प्रचलित पध्दतीनुसार पार पाडावी.

२) खरेदी किंवा नुतनीकरण करण्यात येणाऱ्या बाबीवर राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान ( रुसा ) योजनेचा लोगो स्वंतत्र रित्या प्रथम दर्शनी दिसेल अशा स्वरुपात लावणे अनिवार्य आहे.

३) महाविद्यालयांनी / संस्थांनी विहित कालावधीमध्ये वितरीत करण्यात आलेला निधी पुर्णपणे खर्च करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी. महाविद्यालयांनी / संस्थांनी ज्या उद्दिष्टासाठी मंजूर केलेल्या अनुदानाचा वापर त्याच उद्दिष्टासाठी करावा आणि त्याबाबतचे विनियोग प्रमाणपत्र (Utilization Cartificate ) केंद्र शासनाच्या विहित नमुन्यामध्ये प्रकल्प संचालनालयास वेळेत सादर करणे बंधनकारक आहे.

४) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) अंतर्गत घेण्यात आलेल्या कांमांचे संनियंत्रण खालील नमुद केलेली प्रकल्प सनियंत्रण समिती करेल.

१) प्राचार्य / संचालक - समितीचे अध्यक्ष
२) विभागीय सहसंचालक
३) प्राध्यापक प्रतिनिधी
४) रुसा समन्वयक
५) प्रबंधक - सदस्य सचिव

५) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत प्राप्त निधीचे लेखापरिक्षण करुन अहवालाची प्रत प्रत्येक वर्षी रुसा कार्यालयास पाठविण्यात यावी. तसेच रोख वही स्वतंत्रपणे ठेवण्यात यावी.

६) महाविद्यालयांनी / संस्थांनी रुसा योजने संदर्भातील सर्व कागदपत्रे, लेखापरिक्षण, महालेखापाल, महाराष्ट्र ज १ किंवा प्रकरणपरत्वे महाराष्ट्र- २ नागपूर यांनी सदर कामाकरीता प्राधिकृत केलेले अधिकारी यांना तपासण्याचे

अधिकार असून, त्यांनी मागणी केल्यास सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे तपासणीकरीता उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

७) परिशिष्टामध्ये दिलेल्या कामांची रक्कम वितरीत करण्यात आलेल्या तरतुदीपेक्षा जादा असल्यास मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीच्या मर्यादेपर्यंत नविन बांधकामे / खरेदी / नुतनीकरण करण्यात यावीत.

८) विद्यापीठांनी पुरवठादारास/ कंत्राटदारास त्यांना अदा करावयाची देयकाची रक्कम RTGS द्वारे त्यांच्या बँक खात्यात वर्ग करावी.

९) या आदेशान्वये रुपये २५ लक्ष इतका निधी RTGS द्वारे महाविद्यालये / संस्थाच्या रुसा बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येत आहे.

(स्थळ प्रत मा. प्रकल्प संचालक यांनी मान्य केली आहे.)

सहसंचालक
राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान (रुसा)

प्रति-

१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) प्राचार्य, शासकिय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली
४) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१/२ महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर
५) महालेखापाल, (लेखा व परिक्षण)-१/२ महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर
६) सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर
७) उपसंचालक (वित्त), राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान
८) निवड नस्ती (रुसा)

## परिशिष्ट

## शासकिय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली

### खरेदी करावयाच्या साहित्याची यादी

| Sr. No. | Head | Description of Item | No. | Cost. |
|---|---|---|---|---|
| 1 | **Computerization of College Department** | Computers | 08 | 6,18,898 |
| | | Server | 01 | |
| | | Soul Software | 01 | |
| | | Barcode Scanner | 05 | |
| 2 | **Purchase Equipments for College** | LCD Projector | 04 | 4,05,000 |
| | | AC | 04 | |
| 3 | **Purchase of Books & E-journals** | Library books as per list | - | 14,77,000 |
| | | Online E resources (Library) | - | |
| | **Total (Rupees Twenty Five Lakhs Eight Hundred Ninety Eight Only)** | | | **25,00,898** |